आंबेगाव तालुका विद्या विकास मंडळ संचालित,

बी.डी.काळे महाविद्यालय,घोडेगाव ता.आंबेगाव जि.पुणे

मराठी विभाग

वार्षिक कामकाज अहवाल २०२४–२०२५

महाविद्यालयातील मराठी विभाग ऑगस्ट १९९३ मध्ये सुरू झालेला आहे.विभागामध्ये पदवी व पदव्युत्तर असे दोन विभाग कार्यरत आहे.त्यांची वर्गनिहाय विद्यार्थी संख्या खालीलप्रमाणे

| अ.क्र. | वर्ग | मुले | मुली | एकुण |
|---|---|---|---|---|
| १. | द्वितीय वर्षकला | ०३ | १२ | १५ |
| २. | तृतीय वर्षकला | ०४ | ०२ | ०६ |
| ३. | एम.ए.भाग १ | ०५ | ०४ | ०९ |
| ४. | एम.ए.भाग २ | ०० | ०१ | ०१ |
| | | | एकुण | ३२ |

मराठी विभागाने राबविलेले उपक्रम खालीलप्रमाणे

१) विद्यार्थी सभा

मराठी विभागातील विद्यार्थ्यांची सभा दि. ०१/०८/२०२४रोजी आयोजित करण्यात आली होती.याप्रसंगी विभागप्रमुख प्रोफेसर प्राचार्य डॉ.ज्ञानेश्वर वाल्हेकर यांनी मार्गदर्शन केले.विभागातील सहा. प्राध्यापक डॉ.पुरुषोत्तम काळे, पोपट माने,प्रा.तुषार गभाले इ.उपस्थित होते.

२)वाचन प्रेरणा दिन – दि.१६/१०/२०२४ रोजी मराठी विभागाने वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.विद्यार्थी व शिक्षक यांच्या सहभागाने कार्यक्रमाची रंगत वाढली.कवितांचा बहारदार कार्यक्रम आयोजित केला होता.याप्रसंगी ०८ शिक्षक व १०० विद्यार्थी उपस्थित होते.

३)मराठी विभागाने पुणे ग्रंथ महोत्सव अंतर्गत वाचन संकल्प कार्यक्रमाचे दि.०१/०१/२०२५ ते दि. ११/०१/२०२५ पर्यंत आयोजन करण्यात आले होते.यात समूहवाचन, मुक्तसंवाद (प्राचार्य डॉ.ज्ञानेश्वर वाल्हेकर यांच्याशी), वाचन कौशल्य कार्यशाळा (वक्ते डॉ.हनुमंत भवारी यांचे व्याख्यान), वाचन संवाद (डॉ.पुरुषोत्तम काळे यांचे व्याख्यान),घोडेगाव येथील हिराबाई काळे यांच्या मायबोली साहित्य सांस्कृतिक ग्रंथालयास भेट, ग्रंथप्रदर्शन (उदघाटक श्री.बाळासाहेब काशिनाथ काळे,चेअरमन न्यू.इं.मि.स्कूल कमिटी, अॅड.मुकुंदराव काळे,चेअरमन,महाविद्यालय विकास समिती), ग्रंथपरीक्षण स्पर्धा इ. विविध कार्यक्रम संपन्न झाले. याप्रसंगी १०शिक्षक व १०० विद्यार्थी उपस्थित होते.

४)दि.१३/०२/२०२५ रोजी वाचते व्हा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी डॉ. शंकुतला काळे,डॉ.अविनाश सांगोलेकर,श्री.माधव राजगुरू इ.चे व्याख्यान झाले.

५) ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने दि. २७फेब्रुवारी २०२५ रोजी मराठीतील निवडक कविता वाचनाचा बहारदार कार्यक्रम विद्यार्थी व शिक्षकांनी संपन्न केला. यात ५० विद्यार्थी व ०८ शिक्षक सहभागी झाले होते.

६) **व्याख्यान कार्यक्रम** — दि.११/०३/२०२५ रोजी प्रथम वर्ष कला या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी पुणे येथील डॉ.किरण गाढवे यांचे गीतलेखन स्वरूप व वाटचाल या विषयावर ऑनलाईन व्याख्यान झाले. ०४ शिक्षक व ५० विद्यार्थी उपस्थित होते.

७) जागतिक पुस्तक दिन कार्यक्रमाचे मराठी विभागाने दि.२३/०४/२०२५ रोजी आयोजन केले होते. या प्रसंगी वाचन संवाद संपन्न झाला.पाश्चात्य व मराठीतील सर्वोत्तम कलाकृतींचे चर्चा झाली.या प्रसंगी ०४ शिक्षक व २५ विद्यार्थी उपस्थित होते.

**८) सेट नेट परीक्षेत मराठी विभागातील विद्यार्थ्यांचे यश**

यावर्षी घेण्यात आलेल्या राज्य आणि राष्ट्रीय प्राध्यापक पात्रता परीक्षेत मराठी विभागामध्ये पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेतलेले खालील विद्यार्थ्यांनी सेट, नेट परीक्षेत यश प्राप्त केले आहे. संस्था, महाविद्यालय, मराठी विभाग व शिक्षकांच्या वतीने त्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | श्री.वाळुंज पंकज रमेश | नेट, जुन २०२४ |
| २ | श्री.साळवे विशाल गौतम | नेट, जुन २०२४ |
| ३ | कु.फुलपगार वनिता सदाशिव | नेट, जुन २०२४ |

विभागाचे कामकाज करताना संस्थाचालक,सहकारी शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी व सेवक, विभागाचे विद्यार्थी इ.सर्वांचे मोलाचे सहकार्य मिळाल्यामुळे विभाग लौकिकास पात्र ठरला आहे.

मराठी विभाग प्रमुख
बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव
ता आंबेगाव जि. पुणे.

बी.डी.काळे महाविद्यालय कोड नं. ११६ घोडेगाव

प्राचार्य
बी. डी. काळे महाविद्यालय
घोडेगाव, ता.आंबेगाव, जि.पुणे